सायंदैनिक

# गुड इव्हिनिंग City

goodeveningcity@gmail.com www.goodeveningcity.com

१२ जून २०२६, शुक्रवार | वर्ष १५ वे | अंक ६४ | पृष्ठे ६

## जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन १५ जुन रोजी

**बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने जून महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, १५ जून रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात येणार आहे. पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे.

महिला लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पीडित महिलांनी उपजिल्हाधिकारी यांना उद्देशून विहित नमुन्यातील अर्ज द्विप्रतीत सादर करावेत. तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. लोकशाही दिनामध्ये महिलांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, न्यायप्रविष्ट, सेवा व आस्थापना विषयक प्रकरणे तसेच वैयक्तिक स्वरूपाचे नसलेले निवेदन स्वीकारले जाणार नाही. समस्याग्रस्त व पीडित महिलांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून, पीडित महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# सख्ख्या बहिणीचा खून करणाऱ्या भावाला जन्मठेप

**बुलडाणा जिल्हा न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल**

**बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** दारूच्या सवयीमुळे समाजात आणि मित्रांमध्ये बदनामी होत असल्याच्या रागातून सख्ख्या बहिणीचा गळा आवळून व चाकूने वार करून निर्घृण खून करणाऱ्या आरोपी भावाला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. विदर्भ हाऊसिंग सोसायटीमध्ये कोकीळाबाई जाधव राहतात. पतिसोबत पटत नसल्यामुळे त्या वेगळ्या राहत असल्याचे कळते. कोकीळाबाई दोन मुले आणि दोन मुली असा परिवार घेवून गेल्या अनेक वर्षांपासून राहत आहे. मोठ्या मुलीला उबाळखेड येथे देण्यात आले. तर तिच्यापेक्षा छोटा भाऊ उबाळखेडमध्येच राहतो. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकाची मुलगी म्हणजे अंकिता.. अंकिता कमी शिकलेली. तिचे लग्न ब्राह्मण समाजातील राकेश शर्मा सोबत करून देण्यात आले होते. त्याच्यापासून अंकिताला एक ६ वर्षीय मुलगी आणि ४ वर्षीय मुलगा आहे. कंपनीत नोकरीवर असलेल्या राकेशचे दोन महिन्यापूर्वी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. तेव्हापासून अंकिता आपल्या दोन्ही मुलांना घेवून विदर्भ हाऊसिंग

सोसायटीमध्ये आईकडे राहायला आली. मग हळुहळू सागरच्या टपोरीगिरीच्या तक्रारी अंकिता आईकडे करू लागली. ईकडे अंकिता बाहेर जॉब शोधण्यासाठी फिरत होती. तिचे फिरणेही सागरला आवडत नव्हते. दोघे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करून भांडणे करीत होती. पंधरा दिवसांपूर्वी सा-गरने तिला कतरता चाकू मारला होता. पण तेव्हा अंकिताला जास्त लागले नाही. आईने भांडणे सोडविली होती. दोन दिवसांपूर्वी सागरचे आईसोबत वाद झाले आणि आई आपल्या मोठ्या मुलीकडे अंकिताच्या दोन्ही मुलांना घेवून निघून गेली. आता घरात सागर आणि अंकिता दोघेच बहिण भाऊ होते. मध्यरात्री त्यांच्यात पुन्हा जोरदार भांडणे झालीत. १ वाजेच्या सुमारास त्यांच्यात बाथरूमध्येच हाणामारी सुरु झाली. सागरने तिच्या डोक्यात काही तरी अवजड वस्तू मारली. अर्धमेली झालेल्या अंकिता शर्माचा नंतर त्याने गळा आवळून खून केला. बहिणीची झटपट थांबली.. ती शांत झाली.. ती पूर्णपणे मेली आहे, हे खात्री केल्यावर सागर बुलडाणा शहर पोलिस स्टेशनमध्ये हजर झाला. 'मी माझ्या बहिणीचा खून केला आहे', याची कबूली त्याने पोलिसांना दिली. पोलिसांनी त्याला तत्काळ अटक केली होती.

बुलडाणा येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीचंद दौलतराम जगमलानी यांनी दोषी ठरवून जन्मठेपेची आणि १० हजार रुपये दंडाची ठोठावली आहे. दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त कारावासाची शिक्षाही न्यायालयाने सुनावली आहे. तसेच, पीडितांच्या मुलांना नुकसान भरपाई मिळण्याच्या दृष्टीने हे प्रकरण जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे वर्ग करण्यात आले आहे. सागर त्र्यंबक जाधव असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे, तर अंकिता (वय २८ वर्ष) असे मृत बहिणीचे नाव आहे. घटना २८ जुलै २०२० रोजी रात्री १ वाजेच्या सुमारास बुलडाणा येथील विदर्भ हाउसिंग सोसायटी येथे घडली. मृत अंकिता हिला दारूचे व्यसन होते, ज्यामुळे आपली समाजात व मित्रांमध्ये बदनामी होत असल्याचा राग आरोपी सागर याच्या मनात होता. खून करण्याच्या उद्देशाने आरोपीने त्याच दिवशी संध्याकाळी आपली आई कोकिळा त्र्यंबक जाधव आणि अंकिताच्या मुलांना घराबाहेर काढून दिले होते. त्यामुळे आई कोकिळाबाई या नातवंडांना घेऊन बुलडाण्यातच राहणारी आपली दुसरी मुलगी मीरा उजेड हिच्याकडे राहण्यासाठी गेल्या होत्या.



आरोपी सागर जाधव




रात्रीच्या वेळी घरात कोणी नसताना आरोपी सागर याने अंकिताचा केबल वायरने गळा आवळला आणि चाकूने मारहाण करून तिचा खून केला. खून केल्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याने तिचा मृतदेह घराच्या बाथरूममध्ये लपवून ठेवला.

घटनेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच २९ जुलै २०२० रोजी सकाळी आरोपी सागर हा स्वतः बुलडाणा शहर पोलीस स्टेशनमध्ये हजर झाला आणि त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलीस स्टेशनला जाण्यापूर्वी त्याने आपली आई कोकिळाबाई यांना फोन करून, मी अंकिताचा केबल वायरने गळा आवळून खून केला आहे, अशी माहिती दिली होती. आरोपीच्या कबुलीनंतर पोलीस स्टेशन बुलडाणा शहरच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तिथे आधीच आई कोकिळा जाधव हजर होत्या. पोलिसांनी पंचांसमक्ष घटनास्थळाचा व प्रेताचा मरणोत्तर पंचनामा केला. फॉरेन्सिक लॅबच्या टीमने घटनास्थळावरून भौतिक पुरावे व केबल वायर जप्त केली.



ॲड.व्ही.एल.भटकर
जिल्हा सरकारी वकील

त्यानंतर आई कोकिळा जाधव वय ५० यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपीला अटक केली. तपासादरम्यान आरोपीने दिलेल्या माहितीवरून कलम २७ नुसार गुन्ह्यात वापरलेला चाकू आणि त्याचे कपडे जप्त करण्यात आले. तपास अधिकारी पी.एस.आय. अमित राजाराम जाधव यांनी विविध जप्ती पंचनामे करून, साक्षीदारांचे जबाब नोंदवून आणि वैज्ञानिक प्रयोगशाळेचा (उश्र) अहवाल प्राप्त करून न्यायालयात सबळ चार्जशीट दाखल केले.

न्यायालयात गुन्हा सिद्ध करण्यासाठी जिल्हा सरकारी वकील ॲड. व्ही.एल. भटकर यांनी सरकार पक्षातर्फे एकूण ८ साक्षीदार तपासले. यामध्ये आरोपीची आई कोकिळा जाधव यांची साक्ष, घटनास्थळावरील व जप्ती पंचनाम्यातील पंच, वैद्यकीय अधिकारी डॉ. अमर सावळे आणि तपास अधिकारी पी.एस.आय. अमित राजाराम जाधव यांची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली.

सरकारी वकील भटकर यांनी आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी केलेला प्रभावी युक्तिवाद आणि सादर केलेले पुरावे ग्राह्य धरून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीचंद दौलतराम जगमलानी यांनी आरोपी सागर जाधव याला भा.द.वि. कलम ३०२ अंतर्गत दोषी ठरवत जन्मठेपेची सुनावली.

या प्रकरणाचा कौशल्याने तपास पी.एस.आय. अमित राजाराम जाधव यांनी केला, तर न्यायालयीन कामकाजात कोर्ट पैरवी म्हणून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक किशोर कांबळे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या यशस्वी कामगिरीबद्दल पोलीस पथकाचे कौतुक होत आहे.

WALK IN INTERVIEW

Shri Shivaji Education Society, Amravati's

Bal Shivaji Convent, Buldana

Circular Road, Buldana

WANTED

| Sr.No. | Name of Post | No. of Post | Required Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Principal | 01 | B.A./B.Sc with D.Ed/B.Ed. (P.G. candidates will be preferred) |
| 2 | Pre-Primary Teacher | 07 | Any Graduate B.Ed/D.Ed |
| 3 | Primary Teacher | 13 | H.Sc D.Ed/B.A. D.Ed |
| 4 | Physical Teacher | 01 | Graduate, B.P.Ed. |
| 5 | Clerk | 02 | Graduate, MS-CIT |
| 6 | Helper (Ladies Only) | 05 | S.S.C. |
| 7 | Peon | 02 | S.S.C |

Note :- 1. Preference will be given the experienced candidates.
2. Fluency in English is must.
3. Eligible from interested candidates may walk in interview on 16/06/2026 at 10:00 A.M. for details contact 9067057512

Veneu:- Bal Shivaji Convent, Circular Road, Buldana

Signature: Principal, Bal Shivaji Convent, Buldana

Signature: President, School Committee, Bal Shivaji Convent, Buldana

# जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराला घाण पाण्याचे तोरण; रुग्णांची गैरसोय

**बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी/राहुल चव्हाण) :** स्थानिक राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोर गटाराचे पाणी साचल्याने रुग्ण आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रुग्णालयात प्रवेश करण्यासाठी नागरिकांना साचलेल्या घाणीच्या पाण्यातून मार्ग काढावा लागत असून, यामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

रुग्णालयालगत असलेले सुमारे चार फूट खोल गटार तुडुंब भरले असून, त्यातील सांडपाणी थेट गेटसमोर साचत आहे. बसस्थानक ते धाड रोड या मार्गावरील मोकळ्या गटारांची स्थितीही गंभीर असून, अनेक ठिकाणी गटारांना छोट्या ओढ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच ही परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, उन्हाळाभर सुरू असलेले नाल्याचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नाही. परिणामी, पावसाचे आणि सांडपाण्याचे व्यवस्थापन विस्कळीत झाले आहे. रुग्णालय प्रशासन आणि संबंधित यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे ही समस्या अधिक गंभीर बनल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळ पुरेशा प्रकाशव्यवस्थेचाही अभाव आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी ये-जा करणाऱ्या रुग्ण व नातेवाईकांसाठी हा परिसर धोकादायक ठरू शकतो. साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या आरोग्यावरही होऊ शकतो.

या गंभीर समस्येकडे संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन गटारांची स्वच्छता, नाल्याचे अपूर्ण काम पूर्ण करणे आणि परिसरात आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



DODIA ACADEMY OF EDUCATION

LEARN! ENJOY! GROW! DODIA ACADEMY

ONLY INSTITUTE IN THE DISTRICT TO ACHIEVE A PERFECT 100/100 SCORE CBSE BOARDS

Making Maths every student's favourite subject.

Free Psychometric Test for Every
In-depth child strength & weakness analysis.

Our 100/100 Achievers
AWANTIKA AARAKH, YASH CHAVAN, NANDINI SAWALE SHELKE, KRISHNAPRIYA SHELKE, SHIVNANDAN RAJPUT, SAYALI KALE, VIDHI MADAAN, SOPAM GAWATE, DHRUV DANDGE

WHY CHOOSE US?
Spacious & equipped classrooms
Extra gractice for learners
Spacious & well-st series
Experienced and dedicated faculty

NEW BATCHES FOR ACADEMIC YEAR 26-27 STARTING FROM 11TH JUNE
ENROLL FAST! LIMITED SEATS AVAILABLE

CLASSES: NURSERY TO 4TH
CLASS 5TH TO 10TH (FOUNDATION BATCHES)
CBSE • OLYMPIAD
COMPETITIVE EXAMS
CBSE (Academics & Foundation)

Dodia's Building, Beside The Woods Restaurant, Buldhana | Contact: Mr. Tushar Dodia: 7741823212 | B.E. Comp (Gold Medalist) • MBA (Finance) • CFA (USA) • FRM (USA)

बातम्या तसेच जाहीरातीसाठी संपर्क | प्रकाशक : रणजीतसिंग राजपूत ९८५०३७७३४४ | संपादक : ॲड. हरीदास उंबरकर ९७६३४६९१८४ // गुड इव्हिनिंग सिटी सोशल मिडीयावर सुद्धा... किंमत १ रू.

# सरोज महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेत गैरव्यवहार

## देऊळगाव राजा येथील ५४ जणांविरुद्ध गुन्हा

**बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी):** सरोज महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था देऊळगावमही येथील गैरव्यवहार व अपहारीत रक्कम प्रकरणी ५४ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, बुलढाणा यांच्याकडून सुरू आहे.

अरुणा मनोज व्यवहारे, विशेष लेखापरीक्षक वर्ग–१, सहकारी संस्था (साखर), बुलढाणा यांनी सन २०२३ ते २०२५ या आर्थिक वर्षांच्या लेखापरीक्षणादरम्यान संस्थेतील आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आणला. त्यानुसार संस्थेतील गैरव्यवहारास जबाबदार असलेल्या आजी–माजी अध्यक्षा, संचालिका, व्यवस्थापक, कर्मचारी वर्ग तसेच काही कर्जदारांविरुद्ध देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात २१ मे २०२६ रोजी तक्रार दाखल करण्यात आली. या तक्रारीच्या आधारे गुन्हा रजिस्टर क्रमांक २३१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलमानुसार व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १४६ तसेच महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील हितसंबंधांचे संरक्षण) अधिनियम १९९९ चे कलम ३ अंतर्गत एकूण ५४ आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्या आदेशान्वये या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला असून तपासाची कार्यवाही सुरू आहे. दरम्यान, संबंधित पतसंस्थेतील सर्व पीडित




ठेवीदारांना आवाहन करण्यात आले आहे की, सदर प्रकरणात साक्षीदार म्हणून जबाब नोंदविणे आवश्यक असल्याने त्यांनी आवश्यक पुरावे व कागदपत्रांसह आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क साधावा.

अधिक माहितीसाठी पोलीस निरीक्षक आशिष रोही (मो. ९६०७३०८२२४) तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक आर. आर. राऊत (मो. ९५०३५२७८५५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आर्थिक गुन्हे शाखेने केले आहे.

# मोताळा तालुक्यातील तलावा मधील मृत साठ्याचे रक्षण करणार कोण?

**मोताळा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** राज्यासह देशांमध्ये अल निनोचा प्रादुर्भाव येणाऱ्या वर्षी शेतकऱ्यांसह देशवासियांसाठी फार कष्टाचा असणार आहे. हवामान विभागा मार्फत तसेच महाराष्ट्र शासनामार्फत येणाऱ्या वर्षी पावसामध्ये सरासरी तूट जाणवणार असणेबाबत व त्या अनुषंगानेच योग्य ते नियोजन योग्य ते उपाय योजना करणे बाबत सूचना कृषी विभाग तसेच महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत शेतकऱ्यांना करण्यात आलेल्या आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवरती येणारा काळ संकटाचा असणार असे जाणवत असताना राज्यसह बुलढाणा जिल्ह्यामध्ये पिण्याच्या पाण्याची परिस्थिती फारच गंभीर बनत चाललेली आहे अशातच जिल्ह्यासह मोताळा तालुक्यातील काही गावामधे प्रशासनामार्फत टँकरची व्यवस्था करण्यात आली



आहे. संपूर्ण मोताळा तालुक्यात असलेल्या तलावांमध्ये अत्यल्प व मृत पाणीसाठा शिल्लक असून तालुक्यातील तलावांमध्ये अवैधपणे मोटर पंपाने उपसा करून मृत साठ्याचा वापर सुद्धा मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. सदर अवैध उपश्याला आळा घालण्याबाबत तालुक्यातील विविध गावातील शेतकरी ग्रामपंचायत ग्राम सहाय्यक व प्रशासक यांच्याकडे मागणी करीत आहे. तरी शासनाने लवकरात लवकर गाव खेड्यातील तलावावरती अवैधपणे टाकण्यात आलेल्या मोटर पंप तात्काळ बंद करून मृत साठा जनावरांसाठी व गावकऱ्यांसाठी राखीव ठेवावा अशी मागणी शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे.

# वाढत्या आर्थिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर ‘मनी सीलिंग’वरील विचारमंथनाची गरज : प्रदीप बिल्होरे

**देऊळगाव राजा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** वाढती आर्थिक विषमता ही केवळ आर्थिक दरी नसून सामाजिक समतोल, लोकशाहीचे आरोग्य आणि राष्ट्राच्या भवितव्याशी संबंधित गंभीर समस्या आहे, असे मत सामाजिक, कृषी आणि ग्रामीण विकास विषयांचे अभ्यासक प्रदीप बिल्होरे यांनी व्यक्त केले आहे.

त्यांनी स्पष्ट केले की, पूर्वी जमीनधारणेतील विषमता कमी करण्यासाठी ‘लँड सीलिंग’सारख्या संकल्पना अस्तित्वात होत्या. मात्र आजच्या बदलत्या आर्थिक संरचनेत संपत्तीचे स्वरूप बदलले असून भांडवल, उद्योग, वित्तीय साधने आणि कॉर्पोरेट मालकी यांचे केंद्रीकरण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्यामुळे आर्थिक विषमता कमी करण्यासाठी नव्या वैचारिक चर्चेची आवश्यकता निर्माण झाली आहे.

‘मनी सीलिंग’ ही कोणतीही कायदेशीर व्यवस्था नसून संपत्तीच्या न्याय्य वितरणाबाबत विचारमंथन घडवून आणणारी एक वैचारिक संकल्पना आहे. विकासातून निर्माण होणारी संपत्ती, संधी, शिक्षण आणि आरोग्य सुविधा समाजातील अधिक व्यापक घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आज ग्रामीण भागातील शेतकरी वाढत्या उत्पादनखर्च, अनिश्चित बाजारभाव आणि नैसर्गिक आपत्तींच्या दुहेरी संकटात सापडला आहे. त्यामुळे शेती अधिक जोखमीचा व्यवसाय बनत असून शेतकऱ्यांची आर्थिक असुरक्षितता अधिक तीव्र झाली आहे. शेतकरी आत्महत्या हा केवळ कृषी विषय नसून ग्रामीण अर्थव्यवस्था, सामाजिक सुरक्षा आणि मानसिक आरोग्याशी संबंधित गंभीर राष्ट्रीय मुद्दा आहे. यासाठी स्वतंत्र उच्चस्तरीय आयोगाद्वारे सखोल अभ्यास होणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले. या पार्श्वभूमीवर आर्थिक विषमता कमी करण्यासाठी आणि विकासाची फळे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ‘मनी सीलिंग’सारख्या संकल्पनेवर राष्ट्रीय स्तरावर व्यापक विचारमंथन होणे अत्यावश्यक असल्याचे प्रदीप बिल्होरे यांनी सांगितले.

# विशाल मोहिते यांना युवा गझलकार पुरस्कार प्रदान

**बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी):** गझलेतल्या लोकांना मी वारकऱ्यांसारखे समजतो. कारण वारीत गेलेला माणूस आपली जात, आपला धर्म या सगळ्या गोष्टी बाजूला सारून एकमेकांना आनंदाने मिठी मारत असतो. एकंदरीत गझलेने वृत्त तर



शिकवलेच, पण वृत्ती सुद्धा बदलायला शिकवली, अशा भावना युवा गझकार पुरस्कार प्राप्त विशाल मंदा अशोकराव मोहिते यांनी व्यक्त केल्या.

गझलमंथन संस्थेच्या वतीने दिला जाणारा पहिला राज्यस्तरीय युवा गझलकार पुरस्कार विशाल मोहिते यांना ७ जून रोजी गोरेगाव, मुंबई येथे गझलनवाज भीमराव पांचाळे, गझलकार डॉ. शिवाजी काळे यांच्या हस्ते तसेच तर डॉ स्नेहल कुलकर्णी, गोपाल मापारी, श्रीपाद या मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. विशाल मोहिते यांनी हा पुरस्कार आपल्या आई– वडीलांना समर्पित केला असून पुरस्काराचे श्रेय भाऊ, बहिण, जिवलग मित्र अभिषेक चोपडे यांना दिले आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल समाजातील विविध घटकांकडून त्यांच्यावर कौतूकाचा वर्षाव होत आहे.

**आपल्या वाट्याची दुनिया हिरवी करुया**

ना कुणाचा हात पाठी, ना घराणे गाजलेले, माझियापासून झाला हा सुरू इतिहास माझा. या गझलकार वंदनाताई पाटील यांच्या ओळीचा आधार घेऊन विशाल मोहिते यांनी आपल्या गझल लेखनाच्या प्रवासाबद्दल सविस्तर सांगितले. गझलेनेच राज्यभर ओळख प्राप्त करून दिली. २०२३ मध्ये ’लक्ष्मण जेवणे पुरस्कार’मिळाल्यानंतर आता २०२६ मध्ये युवा गझलकार पुरस्कार मिळाला याचे आत्मिक समाधान आहे असे त्यांनी सांगितले.

# किन्हीनाईक गावासाठी टँकर मंजूर

**बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता चिखली तालुक्यातील किन्ही नाईक गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

किन्ही नाईक येथे ७०० पशुधन व २६०९ लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ६२ हजार १८० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी, बुलढाणा यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# स्वाधार योजनेसाठी शासकीय वसतिगृह अर्ज करणे बंधनकारक; १० जूनपासून ऑनलाइन अर्ज स्वीकारण्यास सुरुवात

**देऊळगाव राजा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य मिळावे या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या नियमांमध्ये सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षापासून महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. यापुढे स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले असल्याची माहिती समाज कल्याण विभागाने दिली आहे.

शैक्षणिक सत्र २०२६–२७ साठी मुला–मुलींच्या शासकीय वसतिगृह प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया दिनांक १० जून २०२६ पासून सुरू झाली आहे. गुणवत्तेनुसार किंवा जागेअभावी ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही, त्यांनाच स्वाधार योजनेअंतर्गत लाभासाठी पात्रता मिळणार आहे. मात्र, वसतिगृहासाठी अर्ज न करणारे विद्यार्थी शासकीय वसतिगृह प्रवेश तसेच स्वाधार योजना या दोन्ही सुविधांपासून वंचित राहू शकतात.

मागील शैक्षणिक परीक्षेत किमान ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थी स्वाधार योजनेसाठी पात्र राहतील. ज्या तालुक्यांमध्ये शासकीय वसतिगृहाची सुविधा उपलब्ध नाही, तेथे या अटीमध्ये काही प्रमाणात शिथिलता असली तरी भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करण्याच्या अंतिम तारखा पुढीलप्रमाणे आहेत :शालेय विभाग (इयत्ता ८ वी ते १० वी) ३० जून २०२६ पर्यंत कनिष्ठ महाविद्यालय (इयत्ता ११ वी व १२ वी) १५ जुलै २०२६ पर्यंत, बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम १५ जुलै २०२६ पर्यंत विद्यार्थ्यांनी https://hmashew.mahait.org या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज सादर करावेत. अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट, आवश्यक कागदपत्रांच्या प्रतींसह संबंधित वसतिगृह कार्यालयात कार्यालयीन वेळेत जमा करणे आवश्यक आहे.

समाज कल्याण विभागांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहांमध्ये सन २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी पात्र विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देण्यात येणार आहे. त्यामुळे गरजू व पात्र विद्यार्थ्यांनी मुदतीपूर्वी ऑनलाइन अर्ज सादर करून या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त मनोज मेरत यांनी केले आहे.

# बांधकाम कामगारांच्या आकडेवारीची माहिती जाहीर करा : निलेश जाधव

## शिष्यवृत्तीतील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी

**मोताळा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) :** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत बुलडाणा जिल्ह्यात पारदर्शकतेचा



अभाव असून शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेत खोटे दस्तऐवज सादर करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष निलेश जाधव यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याकडे केली आहे.

जाधव यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे म्हटले आहे की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत लाखो नोंदणीकृत कामगारांना आरोग्य, शिक्षण, गृहनिर्माण आदी योजनांचा लाभ दिला जातो. मात्र, जिल्ह्यात या योजनांच्या लाभवाटपाबाबत आवश्यक माहिती सार्वजनिक होत नसल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. विशेषतः शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेत अपात्र लाभार्थ्यांना लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचा दावा त्यांनी केला.

जिल्ह्यात सध्या एकूण किती बांधकाम कामगार नोंदणीकृत आहेत, याची तालुकानिहाय अद्ययावत आकडेवारी जाहीर करावी, अशी मागणी जाधव यांनी केली आहे. तसेच मागील तीन वर्षांत किती कामगारांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली, किती निधी वितरित करण्यात आला आणि लाभार्थ्यांची तालुकानिहाय यादी सार्वजनिक करावी, असेही त्यांनी म्हटले आहे. याशिवाय जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडून नोंदणीकृत बांधकाम मजुरांची माहिती संकलित करण्याच्या प्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील एकूण ग्रामपंचायतींपैकी किती ग्रामपंचायतींनी कामगार कार्यालयाकडे नोंदणीकृत मजुरांची यादी सादर केली आहे, तसेच यादी न पाठवणाऱ्या ग्रामपंचायतींविरोधात कोणती कारवाई करण्यात आली, याची माहिती जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ खऱ्या गरजू बांधकाम कामगारांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून गैरव्यवहारामुळे पात्र लाभार्थ्यांवर अन्याय होत असल्याचे जाधव यांनी नमूद केले. संबंधित सर्व माहिती ३० दिवसांच्या आत सार्वजनिक करून शिष्यवृत्ती वितरणातील कथित अनियमिततेची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

गुड इव्हिनिंग City

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

## अशा प्रकारे आधुनिक साडीचा जन्म...

जेव्हा त्या कोलकाताला परतल्या, तेव्हा इतर महिलांना ही नवीन 'निवी ड्रेप' शैली शिकवण्यासाठी वर्ग आयोजित केले, जिथे शेकडो महिला साडीची ही नवीन आधुनिक आवृत्ती शिकायला आल्या. सुरुवातीला लोकांनी याला 'अश्लील' आणि 'परंपरेच्या विरुद्ध' म्हटले, पण ज्ञानदानंदिनी मागे हटल्या नाहीत. ज्ञानदानंदिनी देवी, ज्यांनी एके काळी फक्त बंगालमधील स्त्रियांना साडी नेसण्याची एक नवीन पद्धत शिकवली होती, त्यांनी कधी कल्पनाही केली नसेल की ही पद्धत संपूर्ण भारतातील महिलांची 'ओळख शैली' बनेल.

# साडीवर ब्लाउज घालण्याची नव्हती परंपरा, तरी बनले संस्कृतीचा भाग!

**साडी हा एक असा पोशाख आहे जो आपल्या संस्कृतीत खोलवर रुजलेला असून स्त्रीचे सौंदर्य वाढवतो. आजकाल साडीसोबत ब्लाउजचे अनेक डिझाइन्स ट्रेंडमध्ये आहेत, पण तुम्हाला कधी प्रश्न पडला आहे का की स्वीटहार्ट, हॉल्टर, बोट नेक किंवा बॅकलेस यांसारख्या डिझाइन्सचा उगम कुठून झाला?**

आज आपण साडीसोबत जे ब्लाउज घालतो, किंवा ज्या प्रकारच्या साड्या नेसतो, त्या कधीही आपल्या संस्कृतीचा भाग नव्हत्या. होय, तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की काही शतकांपूर्वी भारतात साडीसोबत ब्लाउज घालण्याची प्रथा नव्हती. प्राचीन भारतात स्त्रिया साडी नेसून आपला साडीनेच पूर्ण अंग झाकायच्या. ही एक सामान्य गोष्ट होती. मग प्रश्न असा निर्माण होतो कीः ब्लाउज आला कुठून? चला याबद्दल अधिक जाणून घेऊया...



## ज्ञानदानंदिनी देवी कोण होत्या?

आज आपण साडीसोबत जो ब्लाउज घालतो आणि ज्या पद्धतीने साड्या नेसतो, त्याचे संपूर्ण श्रेय ज्ञानदानंदिनी देवींना जाते. त्या एक सामान्य स्त्री नव्हत्या. त्या महान कवी रवींद्रनाथ टागोर यांचे मोठे बंधू सत्येंद्रनाथ टागोर यांच्या पत्नी होत्या. १९ व्या शतकातील बंगालमध्ये स्त्रियांवर अनेक कठोर नियम लादले गेले होते. 'पडदा पद्धती'नुसार, स्त्रियांना घराच्या चार भिंतींमध्ये बंदिस्त राहावे लागत असे. त्यांचे पती सत्येंद्रनाथ हे खूप उदारमतवादी आणि स्त्री हक्कांचे समर्थक असले तरी कुटुंबाच्या कठोर नियमांमुळे ज्ञानदानंदिनींना मोकळा श्वास घेणेही खूप कठीण झाले होते.

## हा बदल कसा सुरू झाला?

जेव्हा ज्ञानदानंदिनी आपल्या पतीसोबत वेगळ्या घरात राहायला गेल्या, तेव्हा बदलाची सुरुवात झाली. पुढे जेव्हा सत्येंद्रनाथ यांची बॉम्बे (आताचे मुंबई) येथे सहायक जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती झाली, तेव्हा ज्ञानदानंदिनी एका नव्या जगात दाखल झाल्या. येथे त्यांना उच्चभ्रू लोकांशी आणि ब्रिटिश समाजाशी संवाद साधण्याची संधी मिळाली.

## एका घटनेने साडीचा इतिहास बदलला...

मुंबईत राहत असताना ज्ञानदानंदिनी देवी एकदा ब्रिटिश राजवटीतील एका उच्चभ्रू क्लबला भेट देण्यासाठी गेल्या होत्या, तेव्हा त्यांना दारातच थांबवण्यात आले. याचे कारण त्यांचा पेहराव होता. साडी नेसण्याची पारंपरिक बंगाली पद्धत, ज्यात शरीराचा वरचा भाग झाकण्यासाठी ब्लाउज किंवा शर्टचा समावेश नसायचा, ती ब्रिटिशांच्या मते 'असंस्कृत' होती. या घटनेने ज्ञानदानंदिनी देवींना आतून हादरवून सोडले आणि त्यांनी आपली साडी नेसण्याची पद्धत बदलण्याचा निश्चय केला, जेणेकरून त्या आपली भारतीय ओळख न गमावता सन्मानाने आधुनिक जगात वावरू शकतील.

## पारशी गारा आणि आधुनिक ब्लाउजचा जन्म



ही इच्छा पूर्ण करण्यासाठी ज्ञानदानंदिनी यांनी मुंबईतील पारशी महिलांकडून प्रेरणा घेतली. आतमध्ये पेटीकोट घालून पारशी पद्धतीने साडी नेसायला सुरुवात केली. वरचा भाग शालीनपणे झाकण्यासाठी त्यांनी इंग्लिश शर्ट्सपासून प्रेरित होऊन कॉलर असलेला ब्लाउज तयार करून घेतला. त्यांनी साडीच्या पुढच्या भागात चुण्या घातल्या आणि पदर डाव्या खांद्यावर घ्यायला सुरुवात केली, ज्यामुळे पदर खाली करून साडी नेसण्याची प्रथा सुरू झाली.

# सुटकेस भरण्याची सर्वोत्तम पद्धत... जागा वाचते, कपड्यांना पडत नाही घडी



**कुठे फिरायला जाणे जितके रोमांचक असते, तितकेच पॅकिंग करणे कंटाळवाणे असू शकते. कमी जागेत जास्त सामान कसे बसवायचे आणि कपड्यांना चुरगळण्यापासून कसे वाचवायचे, या द्विधा मनस्थितीमुळे पॅकिंग करणे अत्यंत कठीण होऊन जाते. पॅकिंग करताना तुम्ही अशा द्विधा मनस्थितीत असाल, तर काही सोप्या पॅकिंग हॅक्सच्या मदतीने तुम्ही तुमच्या सुटकेसची जागा दुप्पट करू शकता. यामुळे तुमचे कपडे चुरगळण्यापासून वाचतील आणि तुम्हाला कमी जागेत जास्त सामान बसवता येईल...**

» रोल करा : बहुतेक लोक त्यांचे कपडे सुटकेसमध्ये घडी करून ठेवतात. यामुळे कपड्यांना सुरकुत्या पडतात आणि जागा व्यापली जाते. कपडे गुंडाळल्याने त्यांना सुरकुत्या पडत नाहीत आणि ते कमी जागेत बसतात. टी-शर्ट, जीन्स, पायजमा, कुर्ता इत्यादी कपडे सहजपणे गुंडाळून सुटकेसमध्ये ठेवता येतात.

» फॉर्मल कपड्यांसाठी बंडल रॅपिंग : जर तुम्ही एखाद्या फॉर्मल इव्हेंटला जाण्यासाठी प्रवास करत असाल आणि कोट, पँट, रेशमी साड्या किंवा महागडे गाऊन घेऊन जात असाल, तर त्यांना बंडल रॅप करा. जीन्स किंवा जॅकेट सुटकेसच्या तळाशी अर्धे आत आणि अर्धे बाहेर पसरवा. फॉर्मल कपडे मध्ये ठेवा आणि नंतर जड कपड्याचा बाहेरील भाग त्यांच्यावर गुंडाळा. यामुळे तुमच्या कपड्यांना सुरकुत्या पडणार नाहीत.

» टिश्यू पेपरचा वापर करा : रेशमी किंवा शिफॉनच्या कपड्यांना घडी घालताना प्रत्येक घडीमध्ये टिश्यू पेपरचा एक तुकडा ठेवा. यामुळे कपडे एकमेकांवर घासले जाणार नाहीत आणि त्यांच्या घड्या तशाच राहतील.


» पॅकिंग क्यूब्स वापरून पहा : पॅकिंग क्यूब्स हे झिपर्स असलेले लहान कापडी डबे असतात. हे क्यूब्स वेगवेगळ्या प्रकारचे कपडे ठेवण्यासाठी वापरले जाऊ शकतात. यामुळे सुटकेसच्या वारंवार होणाऱ्या हालचालींमुळे कपडे जागेवरून सरकणार नाहीत आणि त्यांच्या घड्या खराब होणार नाहीत.

» जागेचा वापर करा : तुमच्या सुटकेसमध्ये जागा वाचवण्यासाठी, कपडे आणि इतर वस्तूंमधील जागेचा वापर करा. तुमचे मोजे, रुमाल किंवा लहान गॅझेट्स तुमच्या बुटांमध्ये ठेवा. तुमचे बूट नेहमी प्लास्टिकच्या पिशवीत गुंडाळा आणि सुटकेसच्या कडेला ठेवा.

» जड वस्तू आधी ठेवा : सुटकेस पॅक करताना, जड वस्तू आधी चाकांच्या बाजूला ठेवा, त्यानंतर गुंडाळलेले कपडे आणि इतर हलक्या वस्तू ठेवा. यामुळे बॅगेचा तोल सांभाळला जाईल आणि जड वस्तूंखाली कपडे दबणार नाहीत.

# लिप ऑइलचे फायदे किती?

**लिप ग्लॉसप्रमाणेच लिप ऑइल ओठांना चमकदार लुक देते, पण ते तितके चिकट किंवा घट्ट नसते. आपले ओठ सुंदर दिसण्यासाठी आपण लिप ग्लॉसपासून लिप बामपर्यंत अनेक उत्पादने वापरतो, पण लिप ऑइल देखील त्यांची देखभाल करण्यास मदत करते. आपण लिप ग्लॉस आणि लिप ऑइलमधील फरक जाणून घेऊ...**



लिप ग्लॉस अधिक घट्ट असतो. तो रंगीतही असतो आणि लिपस्टिकसारखा परिणाम देतो. लिप ऑइल पातळ असते. ते अधिक पारदर्शक दिसते आणि रंग देत नाही. या दोन्हींव्यतिरिक्त लिप बामचाही मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. लिप बाम या दोन्हींपेक्षा अधिक घट्ट असतो. तो ओठांवर एक थर तयार करतो. तो चमकदार लुक देत नाही आणि सहसा त्यात रंग नसतो.

## लिप ऑइल अधिक फायदेशीर का?

लिप ऑइल ओठांना अधिक खोलवर आर्द्रता देते, नैसर्गिक चमक आणते आणि खराब झालेले ओठ दुरुस्त करते. रोजच्या वापरामुळे ओठांचे पोषणही होते. लिप ऑइल लावल्यानंतर अनेक तासांनंतरही ओठ ओलसर ठेवते. त्याचा हलका आणि न चिकटणारा फॉर्म्युला लिपस्टिकसोबत वापरण्यास सोपा बनवतो.

## लिप ऑइल कधी लावावे?

» सकाळची दिनचर्या : दिवसभर तुमचे ओठ ओलसर ठेवण्यासाठी तुमच्या सकाळच्या स्किनकेअर रूटीनमध्ये याचा समावेश करा.

» प्रायमर म्हणून : लिपस्टिकचा रंग अधिक चांगला येण्यासाठी तुम्ही याचा प्रायमर म्हणून वापर करू शकता.

» रात्रीचा वापर : झोपण्यापूर्वी लिप ऑइलचा जाड थर लावल्याने तुमचे ओठ खोलवर ओलसर होतात आणि त्यांची दुरुस्ती होते.

» दिवसभर : दिवसा कोणत्याही वेळी तुमचे ओठ कोरडे वाटल्यास, तुम्ही ते पुन्हा लावू शकता.

# युवा

गुड इव्हिनिंग City

# कितो खरा, कितो खोटा...

## या गोष्टींकडे लक्ष द्या, लगेच कळून जाईल!

**समोरच्या व्यक्तीशी तुमचे नाते खरे आहे असे तुम्हाला वाटते का? तुमचा पार्टनर हे नातं प्रामाणिकपणाने सांभाळतोय की हा सगळा भ्रम आहे? तुमच्याही मनात शंका असेल तर या ५ गोष्टींकडे गुपचूप लक्ष द्या आणि तुमच्या नात्याची परीक्षा घ्या. अनेकदा असे घडते की आपण एखाद्यावर खूप विश्वास ठेवतो आणि नंतर आपल्याला जाणवते की आपण ज्या व्यक्तीवर एवढे प्रेम करतो, त्याचे वेगळेच काहीतरी सुरू आहे. तुम्हीही जोडीदाराच्या बोलण्याने फसत असाल आणि खोटं नातं खरं मानत असाल तर हा लेख खास तुमच्यासाठी आहे... या लेखात आम्ही तुम्हाला अशाच काही गोष्टींबद्दल सांगणार आहोत, ज्याकडे लक्ष दिल्यास काही मिनिटांतच नात्याचे संपूर्ण सत्य समोर येईल. मग तुम्ही तुमच्या नात्याची लिटमस टेस्ट घ्यायला तयार आहात का?**



- लोकांसमोर वागणूक पहा : तुमचा जोडीदार तुमच्याशी एकट्यात प्रेमाने आणि आदराने बोलतो. पण बाहेरच्या लोकांसमोर त्याचा अधिकार दाखवण्याचा प्रयत्न करतो. असे असल्यास तो किंवा ती तुमच्याशी बनावट नातेसंबंधात आहे. कोणतेही नाते पुढे नेण्यासाठी आदर सर्वात महत्वाचा असतो. जर तुमचा मित्र, प्रियकर-प्रेयसी, नवरा-बायको किंवा इतर लोक तुमच्याशी प्रेमाने बोलत नसतील आणि तुमचे बोलणे महत्त्वाचे मानत नसतील तर तुमच्याशी नाते ठेवून त्यांना काही फरक पडत नाही. अशा संबंधांमध्ये तुमचा वेळ घालवू नका.
- अतिशयोक्ती करणारे : जे लोक आपल्यावर प्रेम करतात आणि आपल्याला त्यांच्या जीवनाचा एक भाग मानतात ते नेहमी आपल्या चुकांवर प्रकाश टाकतात आणि योग्य ते चुकीचे स्पष्ट करतात. जर तुमचा जोडीदार तुम्हाला जे ऐकायला आवडते त्याबद्दलच तुमच्याशी बोलत असेल किंवा तुम्हाला खूश करण्याचा प्रयत्न करत असेल तर हे तुमच्या नात्यातील प्रामाणिकपणाच्या अभावाचे लक्षण असू शकते. अशा लोकांपासून ताबडतोब अंतर ठेवा.
- मोकळेपणाने बोलणे महत्त्वाचे : कोणत्याही नात्यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बोलणे आणि फक्त बोलणे नाही तर आपले विचार आणि भावना देखील सामायिक करणे. कुणास ठाऊक, बोलून तुमचं नातं घट्ट होऊ शकतं किंवा असंही होऊ शकतं की बोलून मनातील सर्व कटुता बाहेर पडून नात्याचं वास्तव समोर येईल.
- आरसा वाईट वेळ दाखवतो : जेव्हा तुम्हाला एखाद्याशी तुमचे नाते ओळखायचे असेल तेव्हा ते वाईट मूडमध्ये किंवा रागावलेले असेल तेव्हा प्रतीक्षा करा. कारण रागाच्या भरात एखादी व्यक्ती आपला स्वभाव गमावून बसते आणि अनेक चुकीच्या गोष्टी करतात. पण जर तुमच्याकडे असे लोक असतील जे तुमची प्रत्येक परिस्थितीत काळजी घेतात आणि नात्यात राग आणत नाहीत, तर तुमचे नाते योग्य दिशेने आहे.

# बॉयफ्रेंडनं फसवलं... पुढे काय?

**मी इशिता. वय वर्षे चोवीस. आज इथे माझ्याबाबतीत घडलेला वाईट प्रसंग आणि त्याचा मी केलेला सामना याविषयी बोलणार आहे. माझं एम.कॉम झालं आणि मी एका खासगी कंपनीत कामाला लागले. तिथे माझी ओळख संदीपशी झाली. तो तिथल्या तीन चार कंपन्यांसाठी कॅन्टीन चालवायचा. देखणा, उंचापुरा संदीप, त्याची बोलण्याची स्टाईल आणि एकूण व्यक्तिमत्वाची मला भुरळ पडली. आम्ही कॉफीसाठी, कधी डिनरसाठी बाहेर भेटू लागलो. काही महिन्यांतच आम्ही एकमेकांच्या प्रेमात पडलो. तोपर्यंत घरात माझ्या लग्नाचा विषय सुरू झाला होता. मी घरच्यांना संदीपशी ओळख करून दिली. माझ्या आईबाबांना तो फारसा पसंत पडला नाही. कारण त्याच्या घरच्यांबद्दल त्यानं नीट माहिती दिली नाही. आई-वडिलांना भेटायचं म्हटल्यावर गुळमुळीत उत्तर दिलं. माझे आई-वडील मला स्पष्ट म्हणाले, की त्याच्या घरच्यांची भेट घेतल्याशिवाय ते कुठलंही मत देणार नाहीत...**

संदीप म्हणाला, की दोन आठवड्यात आई-वडिलांना घेऊन येतो, पण काही ना काही कारण काढून तो ती भेट टाळू लागला. फोन नंबर द्यायला देखील टाळाटाळ केली. माझ्या आईनं मला सांगितलं, हे बघ इशिता, हा मुलगा मला योग्य वाटत नाही. तू याचा नाद सोड. पण मी प्रेमात आंधळी झाले होते. दरम्यान, संदीप मला वेगवेगळ्या भेटवस्तू देऊन आणखी छाप पाडू लागला. वडील म्हणाले, आपल्याला सरळ त्याच्या घरी जाऊन नीट चौकशी करावी लागेल. तू कुठलेही चुकीचे पाऊल उचलू नकोस. पुढे मनस्ताप होईल, असं वागू नकोस. मी त्यांचं ऐकायला हवं होतं. नेमकं तिथेच मी चुकले. एक दिवस संदीप म्हणाला, त्याच्या बहिणीचं लग्न ठरलं आहे आणि आई-वडील त्यात बिझी असल्याने आतापर्यंत इथे येऊ शकले नाहीत. तुम्ही प्लीज गैरसमज करून घेऊ नका. मग त्यानं व्हिडीओ कॉल करून पहिल्यांदा माझं बोलणं त्यांच्याशी करून दिलं. ते माझ्याशी खूप छान बोलले. लग्नाला आवर्जून येण्याचा आग्रह केला. मी तर आनंदाने वेडी झाले. मनातील शंका दूर झाल्या. माझा विश्वास जिंकल्यानंतर तो म्हणाला, इशू, आता तू आणि मी काही वेगळे नाही आहोत. माझी एक इच्छा पूर्ण करायला तुझी मदत हवी आहे. असं म्हणून त्यानं बहिणीच्या लग्नासाठी माझ्याकडून पाच लाख रुपये मागितले. प्लीज घरी सांगू नकोस, असंही म्हणाला. माझे आई- वडील माझ्या पगारातून पैसे घेत नसत. त्यांनी ती रक्कम माझ्यासाठीच वेगळी ठेवली होती. मला इतकी भुरळ कशी पडली माहीत नाही आणि मी चक्क त्याला तितके पैसे दिले. त्यानं चेक नको म्हणत दोन टप्प्यात कॅश मागितली. मी तेव्हा तरी सावध व्हायला हवं होतं, पण माहीत नाही कशी काय



चूक करून बसले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी मला न सांगता तो गायब झाला. मी वारंवार फोन केले, पण त्याचा फोन बंद होता. मी त्याच्या कॅन्टीनमध्ये गेले. तिथे त्याचा पार्टनर होता. तो म्हणाला, की तीन महिन्यापूर्वीच त्यानं कॅन्टीनची नोकरी सोडली होती. मी पुरती फसवले गेले आहे, हे माझ्या लक्षात आलं. मला आई- वडिलांच्या सावध इशाऱ्याचं महत्व समजलं. मग मला लक्षात आलं की त्यानं अनेक वेळा मला त्याच्या रूमवर रात्री येण्यासाठी किंवा हॉटेलवर एक रात्र मुक्कामी जाण्यासाठी सूचवलं होतं. अनेकदा शारीरिक संबंध ठेवण्याची आडून आडून मागणी केली होती. नशीब मी त्यावेळी भुलले नाही. हे सगळं झाल्यावर मी सरळ आई-बाबांकडे गेले. कारण काहीही झालं तरी शेवटी तेच आपल्याला संकटातून सोडवत असतात. त्यांच्याशी काय असेल ते खरं बोलण्याची गरज असते. बाबा आधी चिडले, पण नंतर मला समजावून घेतलं. आम्ही पोलिसांत तक्रार केली, पण पोलीस म्हणाले, मी त्याला रोख पैसे दिले ही मोठी चूक केली होती. तो सापडेल की नाही माहीत नाही, पण मला मात्र आयुष्य भराचा धडा मिळाला. माझ्या बाबतीत जे घडलं ते तुमच्या बाबतीत घडू नये म्हणून हे सगळं सांगितलं. प्रेमात पडताना तुमचं हृदय काहीही म्हणो, मेंदू सतत सावध ठेवायला हवा मैत्रिणींनो. डोळे झाकून वागलात तर पश्चाताप करण्याची वेळ येऊ शकते. जे झालं ते झालं, आता इथून पुढे खूप खूप सावध राहायचं. कुणीही येऱ्यागेऱ्या माणसानं आपला फायदा घेऊन आपल्याला फसवावं इतकं लेचंपेचं मुळीच राहायचं नाही.




# ब्रेकअपनंतर लगेच दुसरे प्रेम...

## जरा थांबा, आधी हे वाचा...

**प्रत्येक व्यक्ती कधी ना कधी कुणाच्या तरी प्रेमात पडतो. काही नाती चिरकाल टिकतात तर काही मध्येच तुटतात. अशा परिस्थितीत, बरेचदा लोक पुढे जाऊ शकत नाहीत आणि भूतकाळात अडकून राहतात. त्यामुळे इच्छा नसतानाही ते स्वतःला भावनिकदृष्ट्या कमजोर समजू लागतात. त्याच वेळी, काही लोक असेही आहेत जे पटकन दुसऱ्या नात्यात अडकतात. पण, ही हृदयाची गोष्ट आहे, जी घाईघाईने नाही तर प्रेमाने आणि आपुलकीने परत येते. अशा परिस्थितीत, आम्ही तुम्हाला काही गोष्टींची जाणीव करून देऊ. ज्या सांगतील की तुम्ही ब्रेकअपनंतर अद्याप नातेसंबंधासाठी तयार आहात की नाही...**

- गाडी अजूनही अडकलेली आहे : ब्रेकअपनंतरही तुम्ही तुमच्या एक्सबद्दल विचार करत असाल तर ते चांगले लक्षण नाही. जर तुम्ही एक्सच्या संपर्कात असाल आणि त्याला पुढे जाताना पाहून तुम्हाला हेवा वाटत असेल तर तुम्हाला थोडा वेळ द्यावा लागेल. दुसऱ्या व्यक्तीला संधी देण्याची ही वेळ नक्कीच नाही. कारण तुमची गाडी अजूनही तिथेच अडकलेली आहे.
- स्वतःच्या आयुष्यात व्यस्त रहा : स्वतःला प्राधान्य देणे आणि आपल्या स्वातंत्र्याचा विचार करणे चांगले आहे, परंतु या स्वभावामुळे कोणालाही आपल्या आयुष्यात येऊ न देणे चुकीचे आहे. तुमच्या आयुष्याचा कोणीही भाग बनू नये अशी तुमची भावना आधीपासूनच असेल तर हे स्पष्ट आहे की तुम्ही सध्या तुमचे आयुष्य कोणाशीही शेअर करायला तयार नाही.
- मला वचनबद्धतेची भीती वाटते : काही लोकांना वचनबद्ध होण्यात अडचण वाटते. अशा परिस्थितीत, जर तुम्हीही कमिटमेंटपासून दूर पळत असाल तर हे असं का आहे हे तुम्ही आधी स्वतःला समजून घेणं गरजेचं आहे आणि मगच नात्यात येण्याचा निर्णय घ्यायला हवा.
- इतरांचे विचार महत्त्वाचे वाटतात : जर तुमचा स्वाभिमान इतर लोक तुमच्याबद्दल काय विचार करतात आणि समजून घेतात यावर अवलंबून असेल तर तुमची स्वतःवर प्रेम करण्याची वेळ आली आहे. जोपर्यंत तुम्ही स्वतःला समजून घेत नाही तोपर्यंत तुम्ही इतर कोणत्याही नात्याशी पुढे जाऊ शकणार नाही. नात्यातून तुम्हाला काय हवे आहे हे जाणून घेणे फार महत्त्वाचे आहे. तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून काय हवंय आणि ते कसं असायला हवं हे तुम्हाला माहीत नसेल तर ते तुम्हाला चुकीच्या नात्यात घेऊन जाऊ शकतं.

# ‘मेडिसिटी’द्वारे जागतिक दर्जाची आरोग्यसेवा परिसंस्था प्रत्यक्षात येणार : मुख्यमंत्री फडणवीस



**बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : ‘मेडिसिटी’ ही रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि प्रतिभेला एका एकात्मिक केंद्रात एकत्र आणणारी जागतिक दर्जाची आरोग्य सेवा परिसंस्था उभारण्याची राज्य शासनाची संकल्पना आहे. ही संकल्पना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या ‘हील इन इंडिया’ या दृष्टिकोनाशी सुसंगत असून लवकरच ती प्रत्यक्षात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक उभारण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल टाकत महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक (सीसी), ब्रुकफिल्ड ॲसेट मॅनेजमेंट आणि आरोधन हेल्थ सिटी (एएचसी) यांनी नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटीच्या विकासासाठी सहकार्य करण्याबाबत सामंजस्य करार केला. या ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच ब्रुकफिल्ड आणि एएचसीचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी क्लीव्हलँड क्लिनिकच्या मुख्यालयात महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधित्व केले. क्लीव्हलँड क्लिनिकच्या पथकाचे नेतृत्व त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. टोमिस्लाव मिहाल्जेविक, डॉ. समीर कपाडिया (अध्यक्ष, कार्डिओव्हॅस्क्युलर मेडिसिन), डॉ. फाल्कोने (अध्यक्ष, इमर्जिंग मार्केट्स) आणि आर्सेलर मित्तलचे कार्यकारी अध्यक्ष तसेच क्लीव्हलँड क्लिनिकचे संचालक मंडळ सदस्य श्री. लक्ष्मी मित्तल यांनी केले. आरोधन हेल्थ सिटीच्या डॉ. सलोनी पटवर्धन याही क्लीव्हलँड येथे उपस्थित होत्या.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज झालेल्या सामंजस्य करारातून ही भागीदारी भारतातील आरोग्य सेवांच्या क्षेत्रातील परिवर्तनकारी प्रवासाची सुरुवात आहे. जगातील सर्वात प्रतिष्ठित आरोग्य संस्थांपैकी एक असलेल्या क्लीव्हलँड क्लिनिकने महाराष्ट्रासोबत या उपक्रमात भागीदारी करण्याचा निर्णय घेतल्याचा आम्हाला अभिमान आहे. डॉ. मिहाल्जेविक यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण क्लीव्हलँड क्लिनिक नेतृत्वाचे तसेच विशेषतः डॉ. समीर कपाडिया आणि लक्ष्मी मित्तल यांचे या उपक्रमाला पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले.

भारताचे पहिले जागतिक स्तरावरील आरोग्य सेवा, संशोधन, वैद्यकीय शिक्षण आणि वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून संकल्पित करण्यात आलेली नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत सुमारे २५० एकर क्षेत्रावर विकसित केली जाणार आहे. प्रस्तावित भागीदारीनुसार, क्लीव्हलँड क्लिनिक या प्रकल्पाची प्रमुख संस्था म्हणून कार्य करेल. अत्युच्च दर्जाची आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि रुग्णकेंद्रित आरोग्य सेवा पुरविण्यातील जागतिक अनुभव या प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिला जाईल. या प्रकल्पातून सुमारे १.२ अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक आकर्षित होण्याची आणि १०,००० हून अधिक थेट रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. एनएमआयएमसीची संकल्पना केवळ आरोग्य सेवा पुरविण्यापुरती मर्यादित नाही. या परिसंस्थेमध्ये जागतिक दर्जाची रुग्णालये, वैद्यकीय आणि परिचारिका शिक्षण संस्था, क्लिनिकल संशोधन केंद्रे, जैवतंत्रज्ञान आणि जीवन विज्ञान सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य सेवा नवोन्मेष, वेलनेस पायाभूत सुविधा आणि संबंधित आरोग्य सेवा एकाच सहयोगी कॅम्पसमध्ये विकसित करण्यात येणार आहेत.

# खामगाव शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश सुरू

**खामगाव, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), खामगाव येथे शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. दहावी उत्तीर्ण तसेच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन संस्थेचे प्राचार्य यांनी केले आहे.

प्रवेश इच्छुक उमेदवारांनी वाळीीळेप.वींशीं.सेीं.ळप या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रवेशासाठी तयार करण्यात आलेली प्रमाणित कार्यपद्धतीची माहिती पुस्तिका देखील याच संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑनलाइन अर्ज नोंदविल्यानंतर उमेदवारांनी जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत जाऊन अर्ज निश्चित (कन्फर्म) करून घ्यावा. त्यानंतर प्रवेशासाठी आवश्यक विकल्प (ऑप्शन) सादर करावेत.

प्रवेश प्रक्रियेतील विविध टप्प्यांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये समुपदेशन सत्रांचे आयोजन करण्यात येत असून, त्यामध्ये विविध व्यवसायांची माहिती दिली जाते. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगाव येथे एकूण १८ व्यवसायांसाठी ६२० प्रवेश क्षमता उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मासिक विद्यावेतनामध्ये वाढ करण्यात आली असून, विविध प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना देखील लागू करण्यात आली आहे. आयटीआयमधून व्यावसायिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार तसेच उच्च शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध होत असल्याने अधिकाधिक विद्यार्थ्यांनी आयटीआय प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगाव यांनी केले आहे.

# संतनगरी शेगाव येथे जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळ्याचे आयोजन.!



**बुलढाणा, ११ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य, जगद्गुरु रामानंदाचार्य दक्षिणपीठ नाणीजधाम यांच्या समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळयाचे आयोजन १४ व १५ जून २०२६ रोजी गणेश प्रस्थ मंगल कार्यालय,एम.एस.इ.बी.चौक, खामगाव रोड, शेगांव जि. बुलढाणा येथे सकाळी ९:०० वाजता आयोजन करण्यात आले आहेअशी माहिती पश्चिम विदर्भ पीठ प्रमुख कुंडलिकराव वायभासे, व्यवस्थापक सुरेश मोरे, पीठ प्रसिद्धी प्रमुख अमर इधोळ यांनी एका प्रसिध्दी प्रत्रकाद्वारे दिली आहे.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने संस्थानाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात जसे की, ग्रामस्वच्छता अभियान, शैक्षणिक उपक्रमांतर्गत इंग्रजी माध्यमांची मोफत शाळा, मोफत वेदपाठ शाळा, रक्तदान शिबिर, वैद्यकीय उपक्रमांतर्गत मोफत दवाखाना, मरणोत्तर देहदान, मोफत रुग्णवाहिका सेवा - महाराष्ट्रात विविध महामार्गावर ५३ रुग्णवाहिका २४ तास अखंडपणे अपघातग्रस्तांच्या सेवेत कार्यरत आहेत. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे पुनर्वसन, महिला सक्षमीकरण अंतर्गत मोफत शिलाई यंत्र वाटप, मोफत घरघंटी वाटप, आपत्कालीन मदत उपक्रम, कायदेविषयक साक्षरता शिबिरे, रक्तदान शिबिरांतर्गत या वर्षी जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून अवघ्या १५ दिवसांमध्ये १ लाख ७१ हजार १५० रक्त कुपिंकांचे संकलन करण्यात आले, ब्लड इन नीड, ‘एक पेड माँ के नाम’ वृक्षारोपण उपक्रमांतर्गत १ लाख १० हजार ६८७ वृक्षारोपण नोव्हेंबर २०२५, महिन्यांमध्ये करण्यात आले, तसेच डिसेंबर २०२५ या महिन्यांमध्ये ४,५९८ वनराई बंधारे बांधण्यात आले यांसारखे अनेक सेवा प्रकल्प सातत्याने राबवले जात आहेत.

या कार्यक्रमासाठी पश्चिम विदर्भ पिठ अंतर्गत जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक भक्त, साधक, शिष्य, हितचिंतक यांनी १४ व १५ जून रोजी जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रवचन व दर्शन सोहळ्याचा लाभ घ्यावा. या कार्यक्रमात १४ जून रोजी साधक दीक्षा व १५ जून रोजी उपासक दीक्षा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी जास्तीत जास्त भाविकांनी उपासक दीक्षा व उपासक यांनी साधक दीक्षा घेण्यासाठी नोंदणी करावी. या समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळयासाठी येणाऱ्या भाविकांसाठी कार्यक्रमाच्या दोनही दिवस महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी या महंन्मंगल समयी आपण सर्वांनी सहकुटुंब, सहपरिवार, आप्तइष्ट मित्रांसह उपस्थित राहून परमश्रद्धेय रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रवचन व दर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन पीठ इंजिनिअर दिपक चिंचोले, पीठ महिला प्र. व जिल्हा निरीक्षक लता चिंचोले, पीठ सदस्य संतोष दसरे, जिल्हा अध्यक्ष गणेश खडोळ, जि. म. अध्यक्षा निंभोरे, प्र. प्रमुख गुजर तसेच पश्चिम विदर्भ पीठ समिती, जिल्हा तालुका व संतसंग सेवा समिती यांनी केले आहे.

# सामाजिक वनीकरण परिक्षेत्रात ‘एक पेड माँ के नाम’ पर्यावरण दिनी वृक्षारोपण

**खामगाव, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : सामाजिक वनीकरण परिक्षेत्र खामगाव व जे. व्ही. मेहता नवयुग विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. 'एक पेड मां के नाम' या अभियानांतर्गत जे. व्ही. मेहता नवयुग विद्यालयामध्ये वड, पिंपळ, लिंब व करंज या वृक्षाची लागवड करण्यात आली. तसेच पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा संदेश देण्यात आला.



या कार्यक्रमाला सामाजिक वनीकरणाचे वनक्षेत्रपाल एस.वाय. बोबडे, वनपाल रुपम वाडेकर, वनरक्षक राहुल तायडे, रामेश्वर फड, निशा चव्हाण, उपप्राचार्य ए.बी. इंगळे, पर्यवेक्षक एस.एस. कोल्हे, शिक्षक शिक्षिका गुप्ता, शिक्षिका चौबेसा हिरडकर, शिक्षक देवकते, यांच्यासह इतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी वनक्षेत्रपाल एस.वाय. बोबडे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून सांगितले तसेच 'एक पेड मां के नाम' या अभियानाद्वारे प्रत्येक नागरिकाने आपल्या आईच्या सन्मानार्थ एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे असे आवाहन केले. सदर कार्यक्रम विभागीय वन अधिकारी विपुल राठोड, सहाय्यक वनसंरक्षक श्रीमती पूजा पानसरे यांचे मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

# मारण्याची धमकी देणाऱ्या दोघींवर गुन्हा

**देऊळगाव राजा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : सावखेड भोई येथे शेतीच्या जुन्या वादाचे पडसाद पुन्हा उमटले असून, कांदा चाळीतून कांदे गोळा करत असलेल्या महिलेला जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी दोन महिलांविरुद्ध देऊळगाव राजा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

अरुणा कारभारी डोणे (वय ४०) बी यांच्या तक्रारीवरून रुख्मिणी तुकाराम त डोणे (वय ३२) आणि गंगा पवार (वय ४०) यांच्याविरुद्ध सार्वजनिक ठिकाणी अश्लील भाषेचा वापर करणे, धमकावणे आणि जीवितास धोका असल्याची भीती निर्माण करणे या स्वरूपाच्या आरोपांखाली गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तक्रारीनुसार, फिर्यादी व त्यांचे पती १० जून रोजी सायंकाळी सावखेड भोई शिवारातील कांदा चाळीतून विखुरलेले कांदे गोळा करीत होते. त्यावेळी आरोपी तेथे आल्या आणि कांद्याच्या मालकीवरून वाद घालत शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. तसेच पुन्हा येथे आढळल्यास संपूर्ण कुटुंबाला ठार ना मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# श्री शिवाजी हायस्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा

## सेलसुरच्या समृद्धीची 'इस्रो' अभ्यास दौऱ्यासाठी निवड!

**बुलडाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : वैज्ञानिक घडण्याची सुरुवात खरे तर बालवयातच होते. विज्ञानाचे कार्य, कारणमीमांसा आणि जिज्ञासा बाल वयात विद्यार्थ्यांमध्ये जागृत झाली की विवेकी वैज्ञानिक तयार होतो. शिवाजी हायस्कूल सेलसुरमधे विषय शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञानाचे धडे गिरवीणाऱ्या विद्यार्थ्यांनी ISRO भेटी साठी परीक्षा दिली होती. त्यातील समृद्धी शिंदे या विद्यार्थिनीने थेट राज्यात आठवा रँक मिळविल्याने तिची निवड निश्चित झाली आहे. या निवडिने श्री शिवाजी हायस्कूल सेलसुरच्या पगडीत मानाचा तुरा खोवला आहे.



उत्तुंगतेज बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा २०२६ जवळाबाजार, जि. हिंगोली येथील उत्तुंगतेज फाउंडेशन मार्फत ही परीक्षा घेण्यात आली. परीक्षेसाठी राज्यासह श्री शिवाजी हायस्कूल शेलसुर शाळेतील ३४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १८ विद्यार्थी मुलाखतीसाठी पात्र ठरले. यातून समृद्धी दत्तात्रय शिंदे वर्ग ८ ची विद्यार्थिनीची इस्रो (ISRO) अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली.

समृद्धीने महाराष्ट्र राज्यात इयत्ता आठवी ते दहावी गटातून ८ वा क्रमांक (State Rank ८) मिळवून ही मानाची निवड मिळवली.

या यशामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विज्ञानाविषयी विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करून त्यांना संशोधन व वैज्ञानिक दृष्टीकोनाकडे प्रेरित करण्यासाठी उत्तुंगतेज फाउंडेशन सातत्याने कार्यरत आहे. या यशामुळे संस्थेच्या कार्याला आणखी बळ मिळाले आहे. भविष्यात विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील संधी उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा मानस आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे प्राच्यार्य डी एम कापसे, मार्गदर्शक शिक्षक सुनील सपकाळ, लहाने मॅडम, घनश्याम कापसे, निकम यांनी विद्यार्थ्यांना दिलेले सातत्यपूर्ण मार्गदर्शन, विज्ञान विषयाची निर्माण केलेली आवड आणि स्पर्धा परीक्षेसाठी घेतलेले परिश्रम यामुळे हे यश मिळविणे शक्य झाले. त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. ISRO अभ्यास दौऱ्यासाठी झालेली निवड ही विद्यार्थी व शाळेसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

# विद्यार्थी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी तुषार खरे यांची नियुक्ती



**बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : सिंदखेड येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच ग्रामपंचायत सुंदरखेड सावळा गटाचे सन्माननीय सदस्य व युवा नेते तुषार खरे यांची राष्ट्रीय विद्यार्थी संघटना बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशान्वये ही निवड जाहीर करण्यात आली.

तुषार खरे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून बुलढाणा शहरासह संपूर्ण जिल्ह्यात सामाजिक कार्यातून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी गरजू, गरीब आणि कष्टकरी नागरिकांच्या मदतीसाठी सातत्याने पुढाकार घेतला आहे. सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन मदतीचा हात देणे हा त्यांचा स्वभावगुण राहिला आहे. कोरोना काळात सुंदरखेड परिसरातील अनेक गरजू कुटुंबांना भेट देत त्यांनी अन्नधान्य व आवश्यक वस्तूंची मदत केली होती. युवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे कार्यही त्यांनी सातत्याने केले आहे. युवकांना संघटित करून समाजाभिमुख उपक्रमांमध्ये सहभागी करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न कायम राहिला आहे. त्यांच्या या विविध सामाजिक उपक्रमांची दखल घेत काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर विद्यार्थी चळवळीची महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. या नियुक्तीमुळे बुलढाणा शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील काँग्रेस व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून नवचैतन्य संचारले आहे. जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्यानंतर तुषार खरे यांनी पक्षवाढीसाठी आणि युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करणार असल्याचे सांगितले. पक्षाशी एकनिष्ठ राहून संघटन मजबूत करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City

हे पत्रक प्रकाशक, मालक तथा कार्यकारी संपादक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी कल्पक प्रिंटर्स, सराफा लाईन, बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. *कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAMAR/2012/46689

सायंदैनिक
गुड इव्हिनिंग City

१२ जून २०२६, शुक्रवार




# जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराला घाण पाण्याचे तोरण; रुग्णांची गैरसोय



**बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी/राहुल चव्हाण)** : स्थानिक राजमाता जिजाऊ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोर गटाराचे पाणी साचल्याने रुग्ण आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रुग्णालयात प्रवेश करण्यासाठी नागरिकांना साचलेल्या घाणीच्या पाण्यातून मार्ग काढावा लागत असून, यामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

रुग्णालयालगत असलेले सुमारे चार फूट खोल गटार तुडुंब भरले असून, त्यातील सांडपाणी थेट गेटसमोर साचत आहे. बसस्थानक ते धाड रोड या मार्गावरील मोकळ्या गटारांची स्थितीही गंभीर असून, अनेक ठिकाणी गटारांना छोट्या ओढ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच ही परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, उन्हाळाभर सुरू असलेले नाल्याचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नाही. परिणामी, पावसाचे आणि सांडपाण्याचे व्यवस्थापन विस्कळीत झाले आहे. रुग्णालय प्रशासन आणि संबंधित यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे ही समस्या अधिक गंभीर बनल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराजवळ पुरेशा प्रकाशव्यवस्थेचाही अभाव आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी ये-जा करणाऱ्या रुग्ण व नातेवाईकांसाठी हा परिसर धोकादायक ठरू शकतो. साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीच्या आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या आरोग्यावरही होऊ शकतो.

या गंभीर समस्येकडे संबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन गटारांची स्वच्छता, नाल्याचे अपूर्ण काम पूर्ण करणे आणि परिसरात आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन १५ जुन रोजी

**बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येतो. त्याअनुषंगाने जून महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार, १५ जून रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात येणार आहे. पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी अमोल डिघुळे यांनी केले आहे.

महिला लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पीडित महिलांनी उपजिल्हाधिकारी यांना उद्देशून विहित नमुन्यातील अर्ज द्विप्रतीत सादर करावेत. तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असणे आवश्यक आहे. लोकशाही दिनामध्ये महिलांनी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विहित नमुन्यात नसलेले अर्ज, न्यायप्रविष्ट, सेवा व आस्थापना विषयक प्रकरणे तसेच वैयक्तिक स्वरूपाचे नसलेले निवेदन स्वीकारले जाणार नाही.

समस्याग्रस्त व पीडित महिलांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून, पीडित महिलांनी महिला लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# गुलभेली पथकाची हातभट्टी दारूवर कारवाई

## १५ हजार रुपयांचा गावठी दारूसाठा नष्ट, दोघांवर गुन्हे दाखल



**धामणगाव बढे, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी)** : स्थानिक पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ग्राम गुलभेली येथे पोलिसांनी आज धाडसी प्रोव्हिबिशन (दारूबंदी) रेड टाकून गावठी हातभट्टी दारू तयार करण्याचा मोठा साठा जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी एकूण १५,२५० रुपयांचा मुद्देमाल घटनास्थळीच नष्ट केला असून दोन आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गुलभेली येथे बेकायदेशीरपणे गावठी दारू गाळली जात असल्याची गुप्त माहिती धामणगाव बढे चे ठाणेदार नागेश जायले यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे ठाणेदार नागेश जायले ए.एस.आय. गजानन पाटील आणि पोलीस कॉन्स्टेबल संजय जाधव यांच्या पथकाने गुलभेली येथे अचानक छापा टाकला.

पोलिसांनी केलेल्या या कारवाईत दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांच्याकडून मिळालेला मुद्देमाल मध्ये पहिली कारवाई (आरोपी: शंकर पिराजी जाधव, वय ४० वर्षे, रा. गुलभेली) हा आरोपी स्वतः हातभट्टीची दारू गाळताना रंगेहात मिळून आला. त्याच्या ताब्यातून १५ लिटर क्षमतेच्या १५ कॅनमध्ये भरलेला २२५ लिटर सडवा मोहपास (किंमत रु. ६,७५०), २० लिटर तयार हातभट्टी दारू (किंमत रु. २,०००) आणि प्लास्टिक कॅनसह इतर साहित्य (किंमत रु. ५००) असा एकूण ९,२५० रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

दुसरी कारवाई (आरोपी: अण्णा पिराजी जाधव, रा. गुलभेली) या आरोपीच्या ठिकाणाहून १५ लिटर क्षमतेच्या १० कॅनमध्ये असलेला १५० लिटर सडवा मोहपास (किंमत रु. ४,५००), १० लिटर हातभट्टी दारू (किंमत रु. १,०००) आणि इतर साहित्य (किंमत रु. ५००) असा एकूण ६,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.एकूण जप्त व नष्ट केलेला मुद्देमाल पोलिसांनी दोन्ही ठिकाणांवरून मिळून आलेला एकूण १५,२५० रुपये किमतीचा सडवा मोहपास आणि दारूचा साठा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून घटनास्थळावरच नष्ट केला आहे.

याप्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध धामणगाव बढे पोलीस ठाण्यात दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून, पुढील तपास पोलीस करत आहेत. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील अवैध दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

# अल्पवयीन मुलीला फूस लावून पळविल्याचा आरोप; आरोपीस सहकार्य करणाऱ्यावर कारवाईची मागणी

## कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) : अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार देऊनही संबंधित आरोपीविरुद्ध पोलिसांनी अद्याप ठोस कारवाई केली नसल्याचा आरोप करत मोताळा तालुक्यातील तालखेड येथील दाम्पत्याने पोलीस अधीक्षकांकडे तक्रार अर्जासह उपोषणाची नोटीस सादर केली आहे. दोषीवर तत्काळ कारवाई न झाल्यास आमरण उपोषणास बसण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

तालखेड येथील रहिवासी सुनील महादेव सपकाळ व त्यांच्या पत्नी यांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांची १७ वर्षीय मुलगी मोताळा येथील महाविद्यालयात इयत्ता बारावीचे शिक्षण घेत आहे. २१ एप्रिल २०२६ रोजी दीपक जमदाडे (रा. नांदुरा) याने मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत २२ एप्रिल रोजी बोरखेडी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली होती. त्यानंतर ३० एप्रिल रोजीही लेखी तक्रार दाखल करण्यात आली.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, बोरखेडी पोलिसांनी कोणतीही प्रभावी कारवाई न केल्याने ५ मे रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयातही निवेदन सादर करण्यात आले. मात्र त्यानंतरही आरोपीविरुद्ध कारवाई न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच संबंधित तपास अधिकाऱ्यांकडून आरोपीची पाठराखण होत असल्याचा गंभीर आरोपही तक्रारदारांनी केला आहे.

याप्रकरणी आरोपीविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात यावी, तसेच संबंधित तपास अधिकाऱ्यांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मागण्यांची पूर्तता न झाल्यास आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबण्यात येईल, असा इशारा तक्रारदारांनी नोटिशीतून दिला आहे.

# वाढत्या उन्हामुळे सगळ्याच शाळा ३० जूनपासून सुरू होणार; शिक्षण विभागाचा मोठा निर्णय

बुलढाणा, १२ जून (गुड इव्हिनिंग सिटी) : बुलढाणा व विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात मे महिना उलटून जून महिना अर्धा झाला तरी सुर्य आग ओकतच आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने शाळा उशीराने सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. विदर्भातील कडक उन्हाळा आणि वाढते तापमान लक्षात घेता, बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शाळा आता ३० जून पासून सुरू होणार आहेत. जिल्हा परिषद बुलढाणा येथील माध्यमिक शिक्षण विभागाने आज १२ जून रोजी याबाबतचे अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

सर्व माध्यमांच्या शाळांना नियम लागू हा आदेश जिल्ह्यातील कोणत्याही एका बोर्डापुरता मर्यादित नसून, CBSE आणि राज्य मंडळ State Board या अंतर्गत येणाऱ्या सर्व प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शाळांना सरसकट लागू राहणार आहे. विदर्भातील वाढत्या तापमानामुळे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण समिती, पुणे व इतरांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात एक याचिका दाखल केली होती.

शिक्षणाधिकाऱ्यांनी (माध्यमिक) जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी आणि शाळांचे प्राचार्य/मुख्याध्यापक यांना कडक सूचना दिल्या आहेत की, ३० जून पूर्वी कोणत्याही स्तरावर विद्यार्थ्यांना शाळेत बोलविण्यात येऊ नये. शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित सादर करावा असे आवाहन करण्यात आले आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या स्वाक्षरीने हे आदेश जारी करण्यात आले आहेत.